संपादकीय....



## गणेश विसर्जन : परंपरेचा उत्सव, आव्हानांची जाणीव आणि बदलाची गरज

महाराष्ट्राच्या सांस्कृतिक जीवनात गणेशोत्सवाला विशेष स्थान आहे. १० दिवस चालणाऱ्या या उत्सवाचा शेवट विसर्जन मिरवणुकीत होतो. बाप्पाला निरोप देताना भक्तांचा उत्साह, ढोल-ताशांचा गजर, रोषणाई आणि लाखोंचा सहभाग हे चित्र महाराष्ट्रभर दिसते. मात्र या उत्साहाच्या लाटेतून काही गंभीर सामाजिक, पर्यावरणीय आणि शहरी समस्या निर्माण होत असल्याचे वास्तव आता दुर्लक्षित करता येणार नाही.

लालबागच्या राजाचा विसर्जन सोहळा – एक उदाहरण मुंबईतील लालबागचा राजा हा देशातील सर्वात प्रसिद्ध सार्वजनिक गणेशोत्सव मानला जातो. या मंडळाच्या मिरवणुकीत दरवर्षी सरासरी १५ ते २० लाख भक्त सहभागी होतात. विसर्जनाची मिरवणूक तब्बल २० ते २४ तास चालते. पोलिस विभागाच्या माहितीनुसार, फक्त या एका मिरवणुकीसाठी १५०० हून अधिक पोलीस कर्मचारी तैनात केले जातात. मुंबई महानगरपालिकेला विसर्जनानंतरच्या दुसऱ्या दिवशी ३००० मेट्रिक टन कचरा गोळा करावा लागतो. ही केवळ एका मंडळाची आकडेवारी आहे, तर संपूर्ण राज्यभरात १.५ लाखांहून अधिक सार्वजनिक मंडळे आणि घरगुती गणपतींचे विसर्जन होते.

**वाहतुकीचा ठप्प होणारा श्वास**

महाराष्ट्र पोलीसांच्या अहवालानुसार, मुंबई, पुणे, ठाणे, नागपूर आणि नाशिक या प्रमुख शहरांत विसर्जनाच्या दिवशी सरासरी ५० ते ६० मुख्य रस्ते पूर्णपणे बंद करावे लागतात. त्यामुळे रुग्णवाहिका किंवा अग्निशमन दलाला वेळेत पोहोचण्यास अडचण येते. पुण्यातील ससून हॉस्पिटलमधील एका डॉक्टरने नाव न सांगण्याच्या अटीवर सांगितले, दरवर्षी विसर्जनाच्या दिवशी आपत्कालीन विभागात २०–२५ मिनिटे उशिरा पोहोचणाऱ्या रुग्णांची संख्या वाढते. हा वेळ काहीवेळा जीवघेणा ठरतो.

**पर्यावरणाची किंमत**

पर्यावरण विभागाच्या आकडेवारीनुसार, महाराष्ट्रात दरवर्षी विसर्जनावेळी सुमारे १.८ लाख टन झजझ मूर्ती आणि रंगीत सजावटीचे साहित्य पाण्यात टाकले जाते. यामुळे पाण्याचे प्रदूषण इतके वाढते की, तलाव व नद्यांमधील ऑक्सिजनची पातळी ६० टक्क्यांपर्यंत घसरते. परिणामी मासे व इतर जलचर प्राण्यांचे मोठ्या प्रमाणावर मृत्यू होतात. मुंबई उच्च न्यायालयाने २०१९ मध्येच याची दखल घेत पर्यावरणपूरक मूर्तींचा वापर अनिवार्य करण्याचे आदेश दिले होते, मात्र प्रत्यक्ष अंमलबजावणी अजूनही मर्यादित आहे.

**बदलाची दिशा – पर्यावरणपूरक उपक्रम**

अनेक मंडळे आणि स्वयंसेवी संस्था याकडे लक्ष देत आहेत. पुण्यातील कसबा पेठ मंडळाने मागील तीन वर्षांपासून शाडूच्या मातीच्या मूर्ती वापरण्यास सुरुवात केली आहे. त्यांचे अध्यक्ष संतोष कदम म्हणाले, पहिल्यांदा खर्च जास्त वाटतो, पण निसर्गाची हानी टाळायची असेल तर हा बदल आवश्यक आहे. मुंबई महापालिकेने यंदा ३८ कृत्रिम तलाव तयार केले आहेत. मागील वर्षी १.२ लाखांहून अधिक मूर्ती या तलावांमध्ये विसर्जित झाल्या, ज्यामुळे समुद्र आणि तलावाचा भार लक्षणीय प्रमाणात कमी झाला.

**समाजोपयोगी उत्सव**

गणेशोत्सव केवळ धार्मिक सोहळा न राहता सामाजिक बदलाचे व्यासपीठ होऊ शकतो. नागपूरमधील काही मंडळांनी विसर्जन मिरवणुकीऐवजी रक्तदान शिबिर आणि आरोग्य तपासणी शिबिरे आयोजित करण्यास सुरुवात केली आहे. पुण्यातील काही मंडळांनी मिरवणुकीदरम्यान स्वच्छता संदेश देणारे फलक घेऊन मोर्चा काढला. या उपक्रमांमुळे भक्तांच्या श्रद्धेला धक्का न लावता समाजात सकारात्मक संदेश पोहोचवला जातो.

गणेश विसर्जन हा श्रद्धेचा आणि सामाजिक एकात्मतेचा उत्सव आहे. मात्र, त्याचवेळी तो वाहतुकीसाठी, पर्यावरणासाठी आणि सुरक्षेसाठी आव्हान ठरतो. परंपरा जपताना जबाबदारीने वागणे ही काळाची गरज आहे. पर्यावरणपूरक मूर्ती, कृत्रिम तलाव, शिस्तबद्ध मिरवणुका आणि समाजोपयोगी उपक्रम यांच्या माध्यमातून हा उत्सव खऱ्या अर्थाने समाजाला दिशा देणारा ठरू शकतो. श्रद्धा आणि आधुनिकता यांची सांगड घातली तरच बाप्पाचा निरोप आनंददायी आणि जबाबदार ठरेल.

# आभासी आणि खरा मान्सून कसा ओळखावा?



मान्सून हा शब्द अरबी भाषेतून आला आहे. मौसिम या शब्दाचा अरबी भाषेत अर्थ 'ऋतू' किंवा 'हंगाम' असा होतो. नैऋत्य मोसमी वार्यांना आणि त्यासोबत बरसणार्या पावसाला 'मान्सून' हे नाव ब्रिटिशांच्या आगमनानंतर प्राप्त झाले. समुद्रावरून येताना हे वारे मोठ्या प्रमाणात बाष्प आणतात. अनुकूल स्थितीमध्ये या बाष्पाचे रूपांतर ढगांमध्ये होते. या ढगांना योग्य तो थंडावा मिळाला की ते जलधारा बनून पडतात, त्यालाच आपण पाऊस म्हणतो आणि हाच तो 'मान्सूनचा पाऊस' होय.

पाऊस ही एक वातावरणामधली एक प्रक्रिया आहे. जून-जुलैमध्ये मान्सून हिमालयापर्यंत धडकतो. आपल्या कृषिप्रधान भारत देशाचा जुलै ते ऑक्टोबर असा खरीप हंगाम यावर अवलंबून असतो. त्यानंतर त्याचा परतीचा प्रवास सुरू होतो. यावेळी प्रामुख्याने बंगालच्या उपसागरातील बाष्पामुळे आणि 'ईशान्य मोसमी' वार्यामुळे 'रिटर्न म्हणजे परतीचा मान्सून' पाऊस देतो. या पावसावर ऑक्टोबर ते मार्च असा रब्बी हंगाम पिकतो.

अनेकदा शेतकरी मान्सून पुर्व पावसाला मान्सून समजून नियोजन व पेरणी करून मोकळा होतो आणि दुबार पेरणीचे संकट ओढावून आत्महत्या करतो. वादळाच्या प्रभावामुळे मान्सून लवकर येत असल्याचा केवळ आभास निर्माण होत आहे. अशा 'आभासी मान्सून' पासून सावध रहावे. गेल्या वीस वर्षात वेगाने बदललेल्या मान्सून व वादळांच्या पॅटर्न मुळे मान्सून निकष पुन्हा तपासून पाहण्याची गरज आहे. हवामान खात्यातील सकारात्मक बदल, प्रसारमाध्यमांनी घडवून आणलेल्या खुल्या वैज्ञानिक चर्चा व शेतकरी जनतेची लाईव्ह प्रश्नोत्तरे यातूनच कृषी प्रधान भारत देश आत्मनिर्भर होईल.

भारत हवामान विभाग गेल्या १४५ वर्षांपासून शेतकरी व जनतेच्या सेवेसाठी अहोरात्र परिश्रम घेत आहे. हवामान खात्याने दिलेल्या माहितीनुसार मान्सूनचे आगमन पाहून शेतकर्यांच्या शेती कामांचे नियोजन व पेरणीचा निर्णय ठरतो. अचूक हवामान माहितीच्या जोरावर कृषी क्रांती घडली आहे. कृषी प्रधान भारत देशात शेतकऱ्यांना पिकांसाठी मान्सून पाऊस आवश्यक आहे तसेच त्याची खरी माहिती आवश्यक आहे.

यावर्षी निसर्ग वादळामुळे मान्सून लांबणीवर अशी घोषणा झाली. नंतर अवघ्या काही तासांत मान्सून कर्नाटकला पोहोचला ही हवामान खात्याची घोषणा संशयास्पद व शंका निर्माण करणारी ठरते. केरळमधील आठ केंद्रांवर अडीच मिलीमीटर पावसाची नोंद होणे असे निकष वादळी पावसाने केवळ पुर्ण झाले म्हणून आभासी मान्सूनलाच खरा मान्सून असे घोषित करण्यात येत आहे. आणि तो भारतीय शेतीला अतिशय आत्मघातकी ठरू शकतो.

मान्सूनपूर्व पाऊस, मान्सूनचा पाऊस आणि मान्सूनउत्तर पाऊस अशी तीन टप्प्यांत पावसाची वर्गवारी करता येऊ शकते. याशिवाय अचानक येणाऱा अवकाळी पाऊस काय? हे शेतकर्यांनी समजून घेतले पाहिजे. वृत्तपत्रातील बातम्याकधीकधी नव्हे तर अनेकदा शेतकरी आणि सामान्य माणसाच्या मनात गोंधळ निर्माण करतात. म्हणून पावसाला समजून विचार करणे महत्त्वाचे आहे.

**१. मान्सूनपुर्व पाऊस**

यालाच प्री मान्सून रेन म्हणजेच वळीवाचा पाऊस असेही म्हणतात. ढोबळ मानाने मार्च ते मे आणि मान्सून पॅटर्न बदलल्याने सध्या जून मध्ये ही होणारा पाऊस हा मान्सून पुर्व / वळवाचा पाऊस होय. वातावरणातील तापमान हवेचा दाब आर्द्रता आदी घटकांच्या लक्षणीय बदलामुळे अस्थिरता वाढल्याने हा पाऊस होतो. अजस्र क्युमुलोनिंबस प्रकारच्या ढगांमुळे हा पाऊस होतो. वातावरणातील अस्थिरतेमुळे वादळीवारे, गडगडाट व कडकडाट असे विजांचे तांडव, गारा किंवा गारपीट, आकाशात ढगांचे पुंजके वेगवेगळ्या रंगछटा वा शेडमध्ये दिसणे ही हा पाऊस ओळखण्याची साधी लक्षणे किंवा खूण आहे. हा पाऊस दोन प्रकारे कोसळतो.

अ) दिवसभर उष्णता वाढल्यामुळे दुपारी १२ वाजेनंतर आणि जास्त करून २ वाजेनंतर हवा तापल्याने ऊर्ध्व झोत निर्माण होत खालून वरच्या दिशेने हवेचा प्रवास होऊन अस्थिरतेमुळे दिवसा पडतो.

ब) सायंकाळी सुर्य मावळल्यानंतर हवा थंड होऊन वरून खालच्या दिशेने येऊ लागल्याने ढगात घुसळण होत अस्थिरतेने रात्री ते पहाटे सुर्य नसतांना पाऊस पडतो.

**२. मान्सूनचा पाऊस**

ढगांचे पुंजके यात दिसत नाहीत तर आकाश समान एका रंगांच्या शेडमध्ये काळपट दिसते. पाऊस रिपरिप पडत राहतो. मान्सूनपूर्व पावसातली कुठलीच लक्षणे दिसत नाहीत, कारण वातावरण स्थिर झालेले असते.

**३. मान्सून उत्तर पाऊस**

हाच पाऊस मान्सून पश्चात किंवा पोस्ट मान्सून म्हणून पण ओळखला जातो. यात मान्सूनपुर्व पावसाप्रमाणेच सर्व लक्षणे वातावरणात असतात. ढोबळ मानाने याचा कालावधी ऑक्टोबर व नोव्हेंबर असा असून याची तीव्रता कमी असते.

**४. अवकाळी पाऊस**

डिसेंबर ते फेब्रुवारी या कालावधीत होणाऱ्या पावसाला अवकाळी पाऊस म्हणतात. हिवाळी पाऊस असेही याला कधीकधी संबोधतात.

**असा जाहीर होतो मान्सून!**

हवामान खात्याच्या अंदाजानुसार जर केरळमधील आठ केंद्रांवर अडीच मिलीमीटर पावसाची नोंद झाली, तर मान्सूनचे आगमन घोषणा होते. दरवर्षी १० मे नंतर मिनिकॉय, अमिनी, तिरुअनंतपुरम, पुनालुर, कोल्लम, अल्लापुझ्झा, कोट्टयम,कोची, त्रिसूर, कोझिकोडे, थालासेरी, कन्नूर, कुडुलु आणि मंगलोर यावेधशाळांच्या क्षेत्रापैकी किमान आठ ठिकाणी सलग दोन दिवस अडीच मिलीमिटर किंवा त्याहून अधिक पाऊस पडल्यास केरळमध्ये मान्सूनचे आगमन झाले, असे जाहीर केले जाते.

यामुळे मान्सूनपूर्व पावसालाच मान्सून समजून शेतकर्यांनी पेरणी केल्यास दुबार पेरणीचे संकट ओढवून आर्थिक फटका बसू शकतो. पेरणीचा निर्णय घेतांना शेतकरी बांधवांनो आभासी मान्सून पासून सावधान असा सबूरीचा सल्ला ही कृषी व तंत्रज्ञान अभ्यासक म्हणून द्यावासा वाटतो.

**आर्थिक समृद्धीसाठी शेतकर्यांना त्रिसूत्री!**

आत्मनिर्भर भारतासाठी शेतकरी हाच देशाचा खरा सेनापती आहे. देशी बी-बियाणांचा वापर, बहुपिक पद्धती, सेंद्रिय खत-कीटक नाशकांचा वापर ही त्रिसूत्री वापरावी. याबरोबरच अन्नप्रकियेने टिकाऊपण व दर्जा वाढवून व स्वतः किंमत ठरवून आपल्या शेतीमालाची थेट ग्राहकांना विक्री करावी. जमिनीची प्रत, पाण्याची उपलब्धता, हवामान व हंगाम पाहून डाळी, कडधान्ये, तेलबिया, गहू, तांदूळ, मसाल्याचे पदार्थ, हळद, औषधी वनस्पती आदींना लागवड करतांना प्राधान्य द्यावे. तसेच कापसासारख्या आंतरराष्ट्रीय बाजारात मागणी कमी झालेली पिके व त्यांची उत्पादने यांची लागवड व निर्मिती करतांना गांभीर्याने विचार करायला हवा.

**(लेखक आंतरराष्ट्रीय हवामान शास्त्रज्ञ, ढगफुटी तज्ज्ञ, भौतिकशास्त्रज्ञ व भारत सरकारच्या पृथ्वी विज्ञान मंत्रालया अंतर्गत येणाऱ्या इंडियन इन्स्टिटयूट ऑफ ट्रॉपीकल मेटीओरॉजी (आयआयटीएम) पुणे चे माजी हवामान शास्त्रज्ञ आहेत. तसेच गेली १५ वर्षे विना अनुदानित व विनामोबदला शेतकऱ्यांसाठी सुरु असलेल्या 'अंदाज नव्हे माहिती!' या राष्ट्रीय हवामान अलर्ट आणि हवामान माहिती सेवेचे प्रणेते आहेत.)**

**– प्रा. किरणकुमार जोहरे**
**आंतरराष्ट्रीय हवामान शास्त्रज्ञ, पुणे ९१६८९८१९३९**
kirankumarjohare2022@gmail.com



# पंचवीस वर्षात पाचशेहून अधिक लग्न जमविणारा अवलिया

आपल्या मुलामुलींची योग्य वयात लग्न जमविणे हा आजच्या पालकांपुढील मोठा प्रश्न आहे. पूर्वी सोयरीक जुळवताना मध्यस्थ असायचे. आज मात्र लग्न जमविण्यासाठी पुढाकार घेताना कोणी आढळत नाहीत. लग्न यशस्वी झाले तर ठीक अन्यथा मध्यस्थी व्यक्तीला जबाबदार धरले जाई. त्यामुळे कोणी लग्न जमविण्यासाठी पुढाकार घेत नाहीत. मुलामुलींच्या अपेक्षा देखील वाढल्या आहेत. वाढलेल्या या अपेक्षामुळे मुलामुलींची लग्नाची वये उलटून जात आहेत. हा एक मोठा सामाजिक प्रश्न निर्माण झाला आहे. २५ वर्षांपूर्वी हा प्रश्न लक्षात घेऊन इंद्रायणी नगर, भोसरी येथील रमेश शेकोकार यांनी लग्न जमविण्यासाठी पुढाकार घेण्याचे ठरविले आणि सुरू झाले संत रोहिदास वधू - वर सूचक मंडळया पंचवीस वर्षात शेकोकार यांनी जवळपास पाचशे लग्न जमविली आहेत; आणि विशेष म्हणजे यातील बहुतांश लग्ने यशस्वी झाली आहेत.

चर्मकार समाजातील मुलामुलींची लग्न जमविण्यास सुरवात केली आणि हळूहळू इतर समाजासाठीही सेवा देण्यास सुरुवात केली. संत रोहिदास वधुवर सूचक मंडळातर्फे वर्षातून दोनदा मेळावे भरविले जातात. नोंदणी केलेल्या वधूवरांची माहिती, फोटो असलेले पुस्तक दरवर्षी ते प्रसिद्ध करतात. पालक या पुस्तकातून माहिती घेऊन एकमेकांशी संपर्क साधतात. वधुवर मेळाव्यासाठी नाममात्र शुल्क आकारले जाते. या मेळाव्यासाठी महाराष्ट्रातील अनेक जिल्ह्यातून लोक येत असतात. त्यांच्यासाठी जेवणाची व्यवस्था केली जाते.

भोसरी येथील त्यांच्या ऑफिसमध्ये जवळपास २००० मुलामुलींची माहिती संकलित केली आहे. तसेच वेबसाईटवर देखील मुलामुलींची माहिती दिलेली आहे.त्यातूनही आपला स्वप्नवत जोडीदार शोधण्यास मदत होते. आपुलकीच्या भावनेतून शेकोकार मुले मुली निवडण्यात मदत करतात. इतकेच नाही तर हा मुलगा किंवा ही मुलगी आपल्या पाल्यासाठी अनुरूप होईल हे ही सुचवितात. पालकांचा एकमेकांशी संपर्क करून देतात. या वधुवर सूचक मंडळातर्फे संत रोहिदास यांच्या जयंती निमित्त दरवर्षी आरोग्य तपासणी शिबीर, गरीब लोकांना कपडे वाटप,अंध विद्यार्थ्यांना खाऊ व शैक्षणिक साहित्य वाटप,वृक्षारोपण असे उपक्रम आयोजित केले जातात. भोसरीतील अनेक राजकीय, सामाजिक क्षेत्रातील मान्यवर शेकोकार यांना सहकार्य करतात.


शेकोकार यांनी श्री. साई ग्राम विकास प्रतिष्ठानच्या माध्यमातून साईधाम वृद्धाश्रम हा नवीन प्रकल्प मु.पो.वाशेरे, ता.खेड,जि. पुणे येथे सुरू करीत आहेत. निसर्गरम्य वातावरणात वृद्धांच्या सेवेत हा प्रकल्प लवकरच सुरू होईल.

केवळ मी,माझे न पाहता समाजासाठीही आपले काहीतरी देणे आहे या भावनेतून निवृत्तीनंतरही शेकोकार यांची ही सेवा निरंतर सुरू आहे.



**श्री. सुदाम कृष्णाजी विश्वे,**
**( निवृत्त कलाशिक्षक )**
**पुणे – ४११०२१.**
**मो नं. – ९८६०५८६१४७.**

## पक्ष्यांची ओळख ब्राह्मणी घार



दिसायला अतिशय सुंदर असणाऱ्या या घारीच्या डोक्यावरील पांढऱ्या-शुभ्र रंगाचा बुरखा पक्षी निरीक्षकांचे सहज लक्ष वेधून घेतो. पाठ व पंखांवरील तपकिरी तांबूस रंगाची पिसे, या पक्ष्याच्या सौंदर्यात अधिक भर पाडतात. चोच देखिल पांढऱ्या रंगाची असून टोकास पिवळी असते. पाय पिवळ्या रंगाचे असतात व पायाची नखे काळसर असतात. शेपटी टोकास गोलाकार असून शेपटीमध्ये काळ्या रंगाची पिसे असतात. या घारीचा पाणथळ परिसरात वावर असून, नदी किनाऱ्या-लगतच्या पट्ट्यातील भागात तसेच तलावांच्या परिसरात असणाऱ्या वृक्षराजीवर आढळते. बेडूक, मासे, लहान साप, व खेकडे यांसारख्या भक्ष्यांची शिकार करून खाते. उन्हाळ्यात विणीचा काळ जवळ येऊ लागताच, या पक्ष्याचे रंग आकर्षक दिसू लागतात. पाणथळ भागात भक्ष्यांचा वेध घेत असताना दिसते. या वेळी हवेत उडत सुंदर लकबी घेत असताना लक्ष वेधून घेते. निसर्गाच्या अस्तित्वात भर घालणारा हा सुंदर पक्षी पाहून, परतीचा प्रवास करीत असताना निसर्ग-भ्रमण दिन सार्थकी लागल्या-सारखे वाटू लागते.

विणीचा हंगाम – डिसेंबर ते एप्रिल.

**– दिपक शिंदे. (पक्षिमित्र व निसर्ग अभ्यासक)**

'दैनिक महा मेट्रो', मालक, प्रकाशक, संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे, यांनी श्री समर्थ प्रिंटर्स, शॉप नंबर १, बेसमेंट वर्तक अपार्टमेंट, ४९९, शनिवार पेठ, पुणे– ४११०३० येथे छापून फ्लॅट नंबर ९, फ्रेंन्ड्स पॅराडाईज, शिरोळे रोड, शिवाजीनगर, पुणे ४११००४ येथे प्रकाशित केले.
वृत्तपत्रात छापलेल्या बातम्या, लेख, छायाचित्रे व जाहिराती यांच्याशी संपादक सहमत असेल असे नाही. कायदेशीर प्रकरणे पुणे न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.
मालक, प्रकाशक आणि संपादक दिलीप किसन कुऱ्हाडे – ९९२२९३०१९५, कार्यालय संपर्क क्रमांक : ९९७०६८८८६५ ( पी.आर.बी. कायद्याअंतर्गत बातम्याच्या निवडीसाठी जबाबदार.) Email : Mahametronews.pune1gmail.com

This 'Daily Maha Metro', Owner, Publisher by Dilip Kisan Kurhade printed at Shree Samarth Printers, Shop No. 1, Basement Vartak partment, 499, Shaniwar Peth, Pune 411030, Published from Flat No. 9, Friends Paradise Society, Shirole Road, Shivajinagar, Pune-411004.The editor does not necessarily agree with the news, articles, photographs and advertisements printed in the newspaper. Legal matters will be resolved under Pune Courts. Owner, Publisher Editor Dilip Kisan Kurhade Contact No. - 9922930195, Office Contact No. - 9970688865 (Responsible for selection of news under PRB ct.) Email. - Mahametronews.pune@1gmail.com